वाचले :-१) मा.आयुक्त सो.यांचेकडील दि.२७/०७/२०२३ रोजीचा मान्य प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
माध्यमिक शिक्षण विभाग
क्र.माध्य/शि/०१/कावि/८८५/२०२३
दिनांक - ०३/०८/२०२३

विषय - माध्यमिक शिक्षण विभागातील जिल्हा परिषद , एस.एस.सी.बोर्ड व इतर शैक्षणिक कामकाजाकरीता पुर्ण वेळ समन्वयक म्हणून श्री.कराड आदिनाथ शहादेव व श्री.कोपनर सचिन जयसिंग , सहाय्यक शिक्षक यांची नेमणुक करणेबाबत...

आदेश,

पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंतर्गत माध्यमिक शिक्षण विभाग कार्यरत आहे. माध्यमिक शिक्षण विभागांतर्गत मराठी माध्यमाची १७ माध्यमिक विद्यालये व ०९ भागशाळा तसेच ऊर्दू माध्यमाचे ०७ विद्यालये कार्यरत आहेत.त्यामुळे माध्यमिक विद्यालयाचे एकूण २४ विद्यालये व ०९ भागशाळा आहेत.तसेच चालू वर्षी नव्याने चालू झालेली माध्यमिक विद्यालय ,कासारवाडी येथे ऊर्दू माध्यमाचा इयत्ता ९ वी चा वर्ग चालू करणेत आलेला आहे.

माध्यमिक शिक्षण विभागातील शिक्षकांचे रोष्टर व संच मान्यता कामकाज करणे, तसेच विद्यालयांची सर्व प्रकारच्या शिष्यवृत्या,एस.एस.सी बोर्ड कडील कामकाज विद्यालयातील कामकाजाचे वार्षीक नियोजन करणे संचमान्यता जिल्हापरिषदेकडून विहीत मुदतीत मंजुरी करून घेणे, विद्यालयातील शिक्षक कमी जास्त व तक्रारीबाबत अहवाल तसेच सर्व प्रकारे शैक्षणिक कामकाजाबाबत अहवाल मुख्य कार्यालयास सादर करणे विविध उपक्रमाबाबत माहिती विद्यालयात जाऊन घेणे इत्यादी कामकाज करण्यात येते. सदरचे कामकाज हे शैक्षणिकदृष्ट्या महत्वाचे असुन विहीत वेळेत पुर्ण करावयाचे असते. त्याकरीता माध्यमिक शिक्षण विभागातील माहितीगार शिक्षकांची सदर कामकाजाकरीता नियुक्ती करणे आवश्यक आहे.

सबब,मी सहाय्यक आयुक्त, माध्यमिक शिक्षण विभाग मा.आयुक्त सो.यांच्याकडील वाचले क्र.०१ च्या मान्य प्रस्तावानुसार श्री.अदिनाथ शहादेव कराड, सहाय्यक शिक्षक फुगेवाडी भागशाळा बोपखेल व श्री.कोपनर सचिन जयसिंग , सहाय्यक शिक्षक काळभोरनगर भागशाळा चिखली यांची जिल्हा परिषदेकडील व एस.एस.सी.बोर्ड यांचेकडील सर्व प्रकारचे कामकाज सर्व प्रकारे शिष्यवृत्ती बाबतचे कामकाज, तसेच महानगरपालिके व्यतीरिक्त बाहेरील शैक्षणिक संपुर्ण कामकाजात समन्वय ठेवणे , माध्यमिक शिक्षण विभागाचे शैक्षणिक विद्यालय स्तरावरील सर्व कामकाजाचे वार्षिक नियोजन कामकाज करणे , तसेच कार्यालयाकडील शैक्षणिक कामकाजाकरीता समन्वय ठेवणेकामी 'समन्वयक' म्हणून पुर्ण वेळ नियुक्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

श्री.कराड आदिनाथ शहादेव व श्री.कोपनर सचिन जयसिंग , सहाय्यक शिक्षक यांची कामकाजाची बैठक व्यवस्था, थम्ब इंप्रेशन, हजेरी पत्रकावरील स्वाक्षरी माध्यमिक विद्यालय, संत तुकारामनगर येथे ठेवणेत येत आहे. सदरचे कामकाज दिल्यामुळे श्री.कराड आदिनाथ शहादेव व श्री.कोपनर सचिन जयसिंग , सहाय्यक शिक्षक यांना कोणत्याही प्रकारचा अतिरिक्त मेहनताना / आर्थीक मोबदला अदा केला जाणार नाही , तसेच कोणत्याही सेवाजेष्ठतेमध्ये लाभ दिला जाणार नाही. सदरचा आदेश कोणत्याही पदोन्नती करीता ग्राह्य धरला जाणार नाही.

(विजयकुमार थोरात)
सहाय्यक आयुक्त
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८.

प्रति,

१) श्री.कराड आदिनाथ शहादेव, सहाय्यक शिक्षक

२) श्री.कोपनर सचिन जयसिंग ,सहाय्यक शिक्षक

प्रत,

१) मुख्याध्यापक,माध्यमिक विद्यालय, काळभोरनगर

२) मुख्याध्यापक,माध्यमिक विद्यालय,संत तुकाराम नगर

२/-श्री.करांडे आदिनाथ शहादेव व श्री.कोपनर सचिन जयसिंग ,सहाय्यक शिक्षक यांची मासिक हजेरी माध्यमिक विद्यालय,काळभोरनगर व फुगेवाडी या विद्यालयात पाठविणेत यावी.

(संजय नाईकडे)
शिक्षणाधिकारी
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८.